: शिपाई / हमाल पदासाठीच्या स्वच्छता व चापल्यता चाचणीसाठी उमेदवारांना सूचना :

१. दिनांक ९ व १३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ०९.०० ते ०९.३० या कालावधीत उमेदवारांची स्वच्छता व चापल्यता घेतली जात आहे. सदर चाचणीकरिता उमेदवारांची गटनिहाय विभागणी करण्यात आली असून चाचणीचे वेळापत्रक जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर यापूर्वीच अधिसूचीत करण्यात आले आहे.

२. उमेदवारांनी चाचणी वेळापत्रकाची पाहणी करुन दिनांक ९ व १३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ०८.३० वाजता जिल्हा न्यायालयाच्या मुख्य प्रवेशद्वारानजीक उपस्थित प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड यांचेकडून प्रवेशपत्राची (Hall Ticket / Admit Card) पडताळणी करुन घ्यावयाची आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांनी उपस्थिती पत्रकावर त्यांची स्वाक्षरी नोंदविणे बंधनकारक आहे. या प्रयोजनार्थ उमेदवारांनी चाचणीच्या दिवशी सकाळी ठीक ०८.३० वाजता उपस्थित राहणे त्यांच्या हिताचे राहिल.

३. उमेदवारांनी प्रवेशपत्रासोबतच (Hall Ticket / Admit Card) त्यांचे एक ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, वाहन परवाना इ.) सोबत बाळगणे अनिवार्य आहे.

४. चाचणीच्या प्रयोजनार्थ प्रत्येक उमेदवारास बिल्ला (Badge) उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर बिल्ला (Badge) उमेदवारांनी आपल्या छातीवर लावायचा आहे आणि चाचणी संपल्यानंतर तो बिल्ला (Badge) संबंधित पर्यवेक्षी न्यायिक अधिकाऱ्यांना / वरिष्ठ संवर्गीय कर्मचाऱ्यांना परत करणे अनिवार्य आहे.

५. प्रवेशपत्राची (Hall Ticket / Admit Card) पडताळणी पूर्ण झाल्यानंतर प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड यांच्या निर्देशांनुसार उमेदवारांना जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात प्रवेश दिला जाईल.

६. उमेदवारांना ठरवून दिलेल्या गटानुसार जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात उभे केले जाईल व त्यांच्या क्रमांकानुसार त्यांना चाचणीच्या ठिकाणी नेले जाईल.

७. चाचणी परिक्षेच्या दरम्यान उमेदवारांनी शांतता राखणे व शिस्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

८. चाचणींच्या दरम्यान उमेदवारांनी संबंधित न्यायिक अधिकारी व वरिष्ठ संवर्गीय कर्मचारी यांच्या आदेशाचे पालन करणे अनिवार्य राहिल.

९. कोणत्याही प्रकारची तात्कालिक अडचण उद्भवल्यास चाचणीच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या पर्यवेक्षी न्यायिक अधिकाऱ्यांशी / सदस्यांशी संपर्क साधावा.

१०. आवश्यकतेनुसार अधिक सूचना वेळेवर दिल्या जातील.

प्रबंधक,
०८.०८.२०२४

दिनांक : ०८.०८.२०२४ जिल्हा न्यायालय, नांदेड

- - - - - -